नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/११/२०२५ ( रविवार )**

---

# डिझेल चोरी च्या गुन्हयाची तात्काळ दखल घेत आंतरराज्यीय डिझेल चोरी करणारी टोळी निष्पन्न, ४ आरोपी अटक, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक २१/११/२५ चे २२/३० वा. ते दि २२/११/२०२५ चे ०५/३० सुमारास फिर्यादी बाबूराम पद्मराम चौधरी, वय ३३ वर्षे, रा. बाडमेर राजस्थान ह. मू उमरी, ता. सावनेर यांनी त्यांचे ट्रेलर वाहन क्र आर. जे. ३९ जी.बी. ५७३३ ची टॅंक फुल करून सामान लोड करुन सावनेर ते पाढुर्णा रोडने अहमदाबाद गुजरात घेवून जात असता फिर्यादी हे जेवन करणे करीता मौजा विर तेजा ढाबा, भागेमाहेरी येथे थांबले असता काही अज्ञात चोराने ट्रकच्या डिझेल टाकी चे झाकन तोडुन ३०० लिटर डिझेल चोरुन नेल्याची तसेच ट्रक क्रमांक एम एच ४० सिल एल ९८०९ मधुन सुध्दा डिझेल चोरी झाल्याची माहीती केळवद पोलीसांना प्रात्प झाली. अशी माहीती प्राप्त होताच केळवद पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन तांत्रिक पध्दतीने तपास करीत नमुद आरोपी हे पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर कार ने डिझेल चोरी करण्याकरीता आले असल्याचे निष्पन्न केले. आरोपी मध्यप्रदेश कडे गेल्याची सुध्दा माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी तात्काळ आरोपी गेलेल्या मार्गाने आारोपीचा शोध सुरू केला असता खुर्सापार येथे एका धाब्याजवळ नमुद संशयित पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिसायर कार मिळुन आली. केळवद पोलीसांनी आरोपीतांना ताब्यात घेत वाहनाची तपासणी केली असता नमुद वाहनामध्ये डिझेल च्या कॅन आणि डिझेल चोरी साठी वापरलेला पाईप मिळुन आल्याने पोलीसांना हेच डिझेल चोर असल्याची खात्री पटली. नमुद प्रकरणी फिर्यादीच्या रिपोर्ट वरून कलम ३०३(३) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद आहे.

केळवद पोलीसांनी तात्काळ गुन्हयाची दखल घेत आरोपी **नामे १) राजाराम गंगाराम फुलेरीया, वय ४१ वर्ष,२) भगवानसिंग तेजुलाल फुलेरिया, वय २६ वर्ष, ३) रोहीत जीवनलाल फूलेरिया, वय २५ वर्ष, तिन्ही रा. दुपाडा, ता. मोहनबडोदीया, जि शाजापुर,४) अरविंद मोहनलाल परमार, वय २० वर्ष,रा. कालवा, ता. मोहनबडोदिया जि.शाजापुर, राज्य मधप्रदेश यांना दिनांक २२/११/२०२५ रोजी गुन्हयात अटक करून** त्यांचे ताब्यातुन गुन्हयात डिझेल चोरी करण्यासाठी वापरलेले वाहन स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एम एच ०४ जी. डी. ०६०१ , डिझेल कॅन आणि इतर साहित्य असा एकुण ३,४५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी **नामे १) राजाराम गंगाराम फुलेरीया, हा टोळी प्रमुख असुन त्याचेवर महाराष्ट्र,मध्यप्रदेश, छत्तीसगढ येथे सुध्दा डिझेल चोरीचे गुन्हे नोंद असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. नमुद चारही आरोपींचा मा. न्यायालयाने दिनांक २५/११/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर केला आहे.**



## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना तात्काळ घेतले ताब्यात

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— जखमी बाल्या हिरामण गुजर, रा. बिरसा नगर,कुही फाटा ता उमरेड याला दिनांक २३/११/२०२५ रोजी दुपारी शंकरपट गावात आरोपी नामे देवा उर्फ परमेश्वर पिसाराम एकनाथ, रा. वार्ड क्र २ सेलु, ता कळमेश्वर, जि. नागपुर तसेच त्याचे साथीदांर यांनी जुन्या वादाच्या कारणावरून त्याला अग्निशस्त्राने गोळी झाडुन जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची माहीती प्राप्त झाली.

**सदर प्रकरणी पोलीसांनी आरोपी नामे १) देवा उर्फ परमेश्वर पिसाराम एकनाथ २) तपन पिसाराम एकनाथ, ३) आकाश पिसाराम एकनाथ ४) मोरेश्वर पिसाराम एकनाथ ५) सावन काशिराम एकनाथ ६) काशिराम बाबुराव एकनाथ आणि ७) दिनेश सनेश्वर सर्व सेलु, ता कळमेश्वर, जि. नागपुर जि. नागपुर यांचा तात्काळ शोध घेवुन ताब्यात घेतले आहे. नमुद प्रकरणी कळमेश्वर पोलीस पुढील कारवाई करीत आहेत. नमुद जखमी याचेवर नागपुर येथील खाजगी रूग्णालयात उपचार सुरू आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक २१/११/२०२५ रोजी भिवापुर पोलीस पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी समर्थ पेट्रोलपंप येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान टीप्पर ट्रक क्र एम. एच. ४० बी. झेड ७२३८ आणि टीप्पर ट्रक क्र.एम एच ४० डी.सी. १२०५ असे वाहन मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टीप्पर ट्रक क्र एम. एच. ४० बी. झेड ७२३८ चा चालक आरोपी नामे शिशिर निलकंठ झाडे,वय २६ वर्षे,रा. टाकळी नागपुर आणि टीप्पर ट्रक क्र.एम एच ४० डी.सी १२०५ चा चालक खोमेश्वर ताराचंद परतेकी, वय २७ वर्षे,रा. नागपुर, मिळुन आले. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता

त्याचे कडे रेती वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर वाहन मालकाबाबत विचारना केली असता टीप्पर ट्रक क्र एम. एच. ४० बी. झेड ७२३८ चा मालक सहादेव गोस्वामी, वय ४० वर्षे,रा. नागपुर आणि टीप्पर ट्रक क्र एम. एच. ४० बी. झेड ७२३८ चा मालक पांढुरंग उघडे, रा. निबारा, कळमना,जि. नागपुर असे असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष १) दोन्ही वाहनातुन प्रत्येकी ८ ब्रास रेती अशी एकुण १६ ब्रास रेती आणि २) दोन्ही वाहने असा एकुण ६०,४०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद प्रकरणी वरील वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम , कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम, कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे,दारू बाळगुण विक्री तसेच सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २२ गुन्हे नोंद.

दिनांक २२/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, सडवा तसेच इतर साहीत्य असा **एकुण २,५२,६१५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे.पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे ३ गुन्हे नोंद आहे.पोलीस स्टेशन नरखेड येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे.पोलीस स्टेशन सावनेर येथे ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद आहे . पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा

नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापुर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे १ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २२ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ९५४० मिली देशी दारू, १३३२ लीटर मोहाफुल दारू, ३००० लिटर सडवा तसेच इतर साहीत्य असा एकुण २,५२,६१५/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्‌देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने